# आपला महाराष्ट्र

## पावसाचे शुभ वर्तमान पण पेरणीची घाई नको

नेमका मान्सूनच्या हंगामातच एल निनोने भारतीय आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. प्रशांत महासागरात तयार होत असलेली उलथापालथ याला कारणीभूत आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत याचा प्रभाव ८० टक्के आणि त्यानंतर ९० टक्के वाढण्याची शक्यता जागतिक हवामान संघटनेने व्यक्त केलेली आहे. असे जर असेल तर चार महिन्याच्या पावसाळ्यात खंड पडेल आणि तो तुकड्या तुकड्यात विभागला जाईल. पाऊस न पडता या काळात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे किंवा मध्येच मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली जाते. मात्र नेमक्या कुठल्या प्रदेशात तो पडेल हे आजच सांगता येणार नाही. जरी एल निनो च्या प्रभावामुळे एकूण मान्सून काळात पाऊस कमी पडणार असला तरी मध्य भारतात मात्र मुसळधार पाऊस पडण्याच्या घटना वाढू शकतात असेही तज्ञांचे म्हणणे आहे म्हणजेच एकाच हंगामात पावसा अभावी दुष्काळ आणि पावसामुळे दुष्काळ असे गणित समोर येऊ शकते. गेल्या वर्षी देखील एल निनोचा प्रभाव होता मात्र त्यामुळे नुकसान झालेले नाही उलट जास्त पाऊस पडला. १९९७ मध्ये अशाच प्रकारची स्थिती होती. आताही तसे होऊ शकते. पाऊस येणारच आहे पण तो आपला टाईम टेबल पाळेल की नाही याबाबत हवामान तज्ञांच्या मनात शंका आहे. दरवेळी चार महिन्याच्या कालखंडात आपण स्थिर पावसाळा बघत असतो पण यंदाच्या वर्षी तो कधी अचानक कोसळेल तर कधी दीर्घकाळ शांत राहील असे दिसते. म्हणून यासंदर्भात थेट शेतकऱ्यांना माहिती मिळाली पाहिजे. आणि एल निनोचा प्रभाव लक्षात घेता कुठल्या पिकांचे नियोजन करावे यासंबंधी मार्गदर्शन झाले पाहिजे. तसे अजून तरी काही दिसत नाही. त्यामुळे चिंता निर्माण झालेली आहे. आपल्याला सात जूनला पावसाची प्रतीक्षा असते. तत्पूर्वी शेतीची मशागत झालेली असते. बियाणे आणि खते कीटकनाशके यांची खरेदी झालेली असते. सात जून च्या मृगाच्या आगमनानंतर आठवडाभर चांगला पाऊस झाल्यास दुसऱ्या आठवड्यात पेरणीची सुरुवात होते आणि जून अखेरीपर्यंत पेरण्या आटोपतात. आषाढी एकादशीच्या पालख्या आणि वारकरी परत येईपर्यंत एक निंदणी आणि कोळपणी झालेली असते. यावर्षी तशी अवस्था दिसत नाही. सात जून पासून आणि त्या आधीपासून देखील रोहिणी नक्षत्र आणि मृग नक्षत्र कोरडे गेले. मात्र २४ जून पासून तीन आठवड्याच्या प्रतीक्षे नंतर कोकणातील हर्णे बंदरात आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात स्थिर राहिलेला आणि थांबलेला पाऊस पुढे सरकला. दरवेळी तो कोकणातून मुंबईत प्रवेश केल्यानंतर तीन दिवसापर्यंत साधारणपणे कोसळतो आणि नंतर महाराष्ट्रात त्याची सुरुवात होते. पण यंदाचे चित्र काही वेगळेच दिसले. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील जळगाव जिल्ह्यात मुसळधार पावसाची हजेरी लागली. यात काही ठिकाणी थुई थुई पाऊस होता मात्र तो रात्रभर होता. त्याला रातवा म्हणतात तसा होता. पण मुंबईत काही पाऊस पडला नाही तो दुसऱ्या दिवशी सुरू झाला आणि त्याचा जोर फारसा नव्हता. असे विचित्र कालचक्र पावसाबाबतचे सुरू झालेले आहे.

मुंबई आणि उपनगरात सध्या रात्रीच्या तापमानात घट झाली असून शावर प्रमाणे पाऊस चालू आहे. त्यामुळे मुंबईकरांच्या जीवाला थोडा धीर मिळाला. उन्हाच्या तलखीतून त्यांची सुटका झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील तापमान खाली आले आहे. परिणामी उष्मा सुसह्य झाल्याचे जाणवते. त्यामुळे पावसाचे आगमन हे शुभ वर्तमान मानले पाहिजे. मात्र अजून बऱ्यापैकी पावसाची गरज आहे आणि तशी सुरुवात अद्यापि झालेली नाही म्हणून सरकारने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असे आवाहन केलेले आहे. आपल्याकडे पाऊस कसाही असला तरी नगदी पिके घेण्याची सवय लागलेली आहे. पण यंदा या सवयीला थोडा आळा घालावा लागेल. एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे वेळापत्रक बिघडल्याने कमी पावसात येणाऱ्या पिकांचे नियोजन करावे लागेल. एखाद्या वर्षी नगदी पिके नाही घेतली तरी चालतील अशी भूमिका आपली असली पाहिजे. ज्यांच्याकडे पाण्याची व्यवस्था आहे ते नगदी पिके घेऊ शकतात परंतु असलेले पाणी संपल्यानंतर काय करणार असे प्रश्न निर्माण होणार आहेत. म्हणून नेहमीचा हव्यास सोडून द्यावा लागेल. त्यातच शहाणपण आहे. महाराष्ट्राचा फेरफटका आपण केल्यास असे लक्षात येईल ही बुलढाण्याचा काही भाग, अकोल्याचा किमान २५ टक्के भाग, आणि पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यातील धरण क्षेत्रामुळे बागायती पिके दिसतात. अन्यथा सगळीकडे रखरखीत जमीनच दिसते. शेकडो किलोमीटर क्षेत्र कोरडे असते. ते सगळे पावसावर अवलंबून असते. मराठवाड्यात आता जायकवाडी आणि नांदेड जिल्ह्यातील धरणांमुळे थोडे बागायती क्षेत्र वाढले आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण बऱ्यापैकी पाऊस आणि धरणे असल्यामुळे बागायती पिके मोठ्या प्रमाणावर तिथे घेतली जातात. परंतु धरणे भरण्या इतका पाऊस जर पडला नाही तर मात्र बिकट परिस्थिती निर्माण होईल. म्हणूनच पाण्याचे नियोजन फार गरजेचे आहे. १३ टक्क्यांच्या पेक्षा अधिक महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था नाही. बाकीचे सगळे क्षेत्र नैऋत्य मोसमी पावसाच्या भरवशावर आहे. पावसाचे वेळापत्रक बिघडले तर एवढ्या मोठ्या क्षेत्रात दुष्काळ पडेल. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

सगळी अर्थव्यवस्था शेतीच्या भरोशावर नसली तरी शेती जर पिकत नसेल तर बाकीच्या अर्थव्यवस्थेला काही अर्थ उरत नाही. कारण अडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशी परिस्थिती निर्माण होते. अन्नधान्य आणि पाणी कारखान्यात निर्माण होऊ शकत नाही. त्यासाठी पाऊस पडावा लागतो आणि शेती पिकावी लागते. म्हणून समृद्धी, विकास, प्रगती हे शब्द उच्चारण्यासाठी ठीक आहेत प्रत्यक्षात सर्वांगीण प्रगती सर्वांगीण विकास आणि सर्वांगीण समृद्धी ही पावसावर आणि शेतीच्या हंगामावरच अवलंबून असते. ज्यांना शेती माहिती नाही. नळाला पाणी कुठून येते हे माहिती नाही. अन्नधान्य घरात कुठून येते हे माहिती नाही. ते दुकानातून विकत आणले जाते एवढेच माहिती असते. पण शेतीतून हे सगळे येते याबद्दलची खूप लोकांना माहिती नाही त्यातल्या त्यात आधुनिक जगात वावरणाऱ्यांना तर माहितीच नाही. पिझ्झा खायचा पण तो कशामुळे बनतो आणि ज्यामुळे बनतो ते कुठून येते हे ज्यांना माहितीच नसते ते कृषी अर्थव्यवस्थेच्या संदर्भात काहीही सांगू शकत नाहीत. कारखान्यातून येणारी समृद्धी, सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावरून येणारी समृद्धी, आणि बुलेट ट्रेन मधून येणारी समृद्धी हाच अर्थव्यवस्थेचा कणा आहे असे त्यांना वाटत असते. तो त्यांचा दोष नाही तर आपल्या एकूणच व्यवस्थेचा दोष म्हणावा लागेल. तर मुद्दा पावसाचा आहे आणि त्याचे आगमन झाले म्हणजे सर्वांनाच आनंद होतो. सध्या आकाशात ढग आले आणि काही अंशी हजेरी लावून गेले, काही ठिकाणी हजेरी लावत आहेत. तो एकूणच आनंद मनाला उभारी देणारा आहे. हिंदी चित्रपट सृष्टी, मराठी चित्रपट, मराठी आणि हिंदी साहित्य, लोककला, लोकसाहित्य या सर्व माध्यमातून पावसाचे वर्णन बघायला मिळते. पावसाचे आगमन होताच सर्वप्रथम निर्माण होतात कविता. बहिणाबाईंनी पहिल्या पावसाचे फार सुंदर वर्णन केलेले आहे.आला पह्यला पाऊस, शिपडली भुई सारी, धरत्रीचा परमय, माह्य मन गेलं भरी ! अवघ्या चार ओळीत बहिणाबाईंनी जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. पहिला पाऊस आला, जमिनीवर सडा शिंपडावा तसा शिंपडला गेला, त्यामुळे जमिनीचा परिमळ सुटला आणि त्यामुळे माझे मन भरून गेले. अशी निसर्गाशी तादात्म्य पावणारी उदात्त भावना या कवितेतून व्यक्त झालेली आहे. झाडाच्या संदर्भात देखील बहिणाबाईंनी असे म्हटले आहे की, सांग सांग धरती माता, अशी कशी जादू झाली, झाड गेलं निघिसनी.मांघे सावली उरली अशा प्रकारचे निसर्गाशी मैत्री दाखवणारे गान बहिणाबाईनी गायले आहे. पण आता विकासाच्या नावाखाली प्रचंड वृक्षतोड होते त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही. अपेक्षित आर्द्रता निर्माण होत नाही. म्हणून पावसाचे प्रमाण कमी झालेले आहे. कुठे कमी तर कुठे धो धो पाऊस पडतो. तो वाहून जातो. झाडी कमी असल्यामुळे जमिनीत मुरण्याचे प्रमाण कमी आहे. पूर्वी खूप झाडे असल्यामुळे जमिनीत मुरत असे त्यामुळे नदी नाले बारमाही वाहत असत. आता ते चित्र दिसत नाही. पूर्वी मोठमोठी जंगले होती. तरीही दुष्काळ पडायचे असा युक्तिवाद काही जण करतात. ते खरेही आहे. परंतु जंगलांमुळे जमिनीत साठलेले पाणी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जगण्यासाठी मदत करीत होते. तशी मदत आता होत नाही. त्यामुळे आता एकादशी पाशी शिवरात्र गेली आणि उपाशी राहिली अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्याचा विचार सर्व घटकांनी केला पाहिजे. आणि तशी योजना आखली पाहिजे. आशिया खंडात फड पद्धतीसाठी प्रसिद्ध असलेल्या धुळे जिल्ह्यातील पांझरा नदीला बारमाही करण्यासाठी काही लोकांनी खटपट केली होती. पण तो प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही. त्यामुळे त्यावर खर्च झालेला निधी वाया गेला असे म्हणावे लागेल. नदीजोड प्रकल्प चांगला आहे. पण त्याचे काय परिणाम होणार आहेत अजून लक्षात आलेले नाही. त्यामुळे नद्या बारमाही होऊ शकतात. पण मूळ नदीला कुठले धोके निर्माण होतील, तिचे पात्र बदलल्याने जन जीवनावर कुठला परिणाम होईल त्याबद्दल आत्ताच काही सांगता येणार नाही. त्यापैकीच्या कुठल्याही योजना अजून कार्यान्वित झालेल्या नाहीत. जेव्हा होतील तेव्हाच त्यांचा परिणाम दिसेल.तोवर पावसाचे जे नैसर्गिक चक्र आहे त्याचीच प्रतीक्षा करावी लागेल.एल निनोची पार्श्वभूमी असो की अजून काही असो. पाऊस भरपूर यावा, भरपूर पिकावे, शेतकऱ्यांसोबत इतरांनाही दिलासा मिळावा. कृषी अर्थव्यवस्था सुदृढ व्हावी यासाठी निसर्गाची प्रार्थना करूया,

## द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त क्षयरोगमुक्तीसाठी पोषण आहार किटचे वाटप

**शिरपूर, दि.२७- समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातूनसामाजिकबांधिलकी जपत सौ. द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त धुळे जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने तिसऱ्या टप्प्यात पोषण आहार किट वितरणाचा उपक्रम राबविण्यात आला. अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाची सुरुवात शिरपूर येथील आमदार कार्यालयातून करण्यात आली.**

द्वेता पटेल नथवाणी यांच्या संकल्पनेतून तसेच माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, शिरपूर वाडी नगर परिषदेचे गटनेते भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. भारत सरकारच्या प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान अंतर्गत शिरपूर तालुक्यातील क्षयरोग (टीबी) रुग्णांना मोफत पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले.

यावेळी अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन तर्फे सौ. द्वेता पटेल नथवाणी यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण धुळे जिल्ह्यातील टीबी रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्याची घोषणा करण्यात आली. जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून उपचार घेत असलेल्या सुमारे रुग्णांना त्याचा लाभ मिळत आहे.

उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात शिरपूर व थाळनेर क्षयरोग उपचार पथकांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांना एकूण पोषण आहार किटचे वितरण उपजिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले. यामध्ये दि. जून रोजी किट व दि. जून रोजी किट वाटप करण्यात आले.

वितरित करण्यात आलेल्या पोषण आहार किटमध्ये सोयाबीन तेल, शेंगदाणे, मुगडाळ, तांदूळ, सोयाबीन वडी, गहू पीठ, हरभरे, गूळ आणि प्रोटीन पावडर यांसारख्या पौष्टिक पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. टीबी रुग्णांच्या आरोग्य सुधारण्यासाठी आणि उपचार प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी या पोषण किटची मदत होणार आहे.

या प्रसंगी येथे डॉ. अनिल पाटील, डॉ. साळुंखे तसेच अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या समन्वयक सौ. सोनिया भसिन, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक धनराज पवार, छत्रसिंग राजपूत, सौ. ललिता लोखंडे, टीबीएचव्ही अजय जाधव तसेच अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.


## मन की बात कार्यक्रमातून ना.मोदींचा प्रेरणादायी संदेश -मा.आ.कुणाल पाटील



**धुळे,दि.२८ - पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा मन की बात कार्यक्रम विकसित भारताच्या संकल्पनेला अधिक बळ देणारा, नव्या उमेदीची प्रेरणा देणारा आहे. राष्ट्रनिर्मितीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तीचा आणि त्यांच्या समूहाचा गौरव करीत त्यांच्या कार्याला या माध्यमातून उजाळा मिळत असतो. दरम्यान या कार्यक्रमातून प्रत्येकाला प्रेरणादायी संदेश मिळत असतो, त्यातून राष्ट्रनिमिर्णासाठी जनभागिदारी वाढत असल्याची प्रतिक्रीया मा.आ.कुणाल पाटील यांनी व्यक्त केली आहे.**

धुळे ग्रामीणचे मा.आ. कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने त्यांच्या देवपूर धुळे येथील सुंदर सावित्री सभागृहात दि.२८ जून २०२६ रोजी धुळे तालुक्यातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीकांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात हा कार्यक्रम टी.व्ही.स्क्रिनवर दाखविण्यात आला.कार्यक्रमानंतर प्रतिक्रीया देतांना मा.आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, मन की बात हा कार्यक्रम आपल्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी असून देशाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाचा त्यात समावेश असतो. मन की बात या १३५ व्या भागात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी बहूमोल संदेश दिला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, शिक्षण, क्रिडा अशा विविध क्षेत्रात प्रगती करीत आहे. देशातील जनता सरकारच्या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रनिर्माणात सिंहाचा वाटा उचलत आहे. आपले छोटे छोटे प्रयत्न मोठा बदल घडवू शकतात म्हणून प्रत्येकाने देशाहिताचे कार्य करावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. गणेशात्सवात आपल्या मातृभूमीच्या मातीची मूर्ती बसवावी. कारण त्यातून पर्यावरण संर्वधन होते. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन पावसाळ्यात पाणी अडवावे, असा संदेश मन की बात कार्यक्रमातून दिला. मन की बात हा कार्यक्रम विकसित भारताच्या संकल्पनेला अधिक बळ देणारा, नव्या उमेदीची प्रेरणा देणारा आहे, अशी प्रतिक्रीया यावेळी मा.आ. कुणाल पाटील दिली. यावेळी बाजार समितीचे सभापती साहेबराव खैरनार,माजी सभापती बाजीराव पाटील,उपसभापती एन.डी.पाटील, पं.स.चे माजी सभापती भगवान गर्दे, कृऊबाचे माजी उपसभापती योगेश पाटील, जि.प.चे माजी सभापती संग्राम पाटील, बाजार समितीचे संचालक विशाल सैंदाणे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस पंढरीनाथ पाटील,संचालक विश्वास शिंदे, ऋषीकेश ठाकरे,रावसाहेब पाटील, खरेदी विक्रीचे व्हा.चेअरमन पोपट शिंदे, उत्तमसिंग राजपूत, डॉ.दत्ता परदेशी उपस्थित होते.

### प्रकाश में आज




सुनिल दत्त, आशा पारेख, रिना रॉय, रॉकेश रोशन, तारिक, हेलन

### पान १ वरुन

## प्रभाग नऊत एक हजार महिलांना स्मार्ट कार्ड

स्मार्ट कार्ड सहज उपलब्ध व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात नोंदणी केलेल्या महिलांना या कार्यक्रमात स्मार्ट कार्डचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार अनुप अग्रवाल यांनी राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. महिलांना सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. शिबिरात नोंदणी केलेल्या महिलांमधून पारदर्शक पद्धतीने लकी ड्रॉ काढण्यात आला. यामध्ये निवड झालेल्या १५ भाग्यवान महिलांना पैठणी साड्यांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात प्रभाग क्रमांक ९ मधील सिंहस्थ कॉलनीसह परिसरातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या यंत्रणेचे लोकार्पण आमदार अनुप अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. चोरी, चेन सर्केचिंग तसेच इतर गुन्हेगारी घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार असून नागरिकांच्या सुरक्षिततेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नागरिकांची सुरक्षा, सुविधा आणि विकासाला प्राधान्य देत प्रभागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने प्रयतक सुरू राहतील, असेही मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमास स्थायी समिती सभापती लताबाई यशवंत पोद्दार, युवा फाउंडेशनचे अध्यक्ष दिनेश दादा पोद्दार, भाजपच्या गटनेत्या नगरसेविका किरण कुलेवार, नगरसेवक संजय जाधव, नगरसेविका सौ. पूनमताई शिरसाठ, नगरसेवक प्रदीप बैरागी, निनाद पाटील, दीपक कोळी, हेमंत खैरनार, मनोज सोनार, यशोधन पाटील, चेतन माळी, मोठी पाटील तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कछवा मॅडम यांनी केले. महिलांसाठी स्मार्ट कार्ड वितरण, भाग्यवान महिलांना पैठणी साड्यांचे वाटप आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणेचे लोकार्पण अशा विविध उपक्रमांमुळे हा कार्यक्रम प्रभाग क्रमांक मधील नागरिकांसाठी विशेष आकर्षणाचा ठरला.

## मोटर सायकलस्वारांनी तरुणाची चैन चोरली

दुध डेअरीमागे) काल रात्री आठच्या सुमारास मोटार सायकलने जात होते. शहरातील दसेरा मैदान कडुन रेल्वे स्टेशनकडेजाणाऱ्या रोडावर रोडाचे डिव्हायडरजवळ दोन तरुण मोटार सायकलने मागून आले. मोटारसायकलवरील मागे बसलेल्या तरुणाने चेतन जाधव यांच्या गळ्यातील सोन्याची चैन ओढून घेतली. दोघे मोटर सायकल स्वार अग्रसेन चौकाच्या दिशेने वेगात निघून गेले. चेतन जाधव यांनी मोटर सायकलने दोघांचा पाठलाग केला परंतु दोघेही सापडू शकले नाहीत. ३० ग्रॅमची सोन्याची चैन असुन ५५ हजार रुपये तिची किंमत आहे. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक शत्रुघ्न पाटील तपास करीत आहेत.

### बाजारभावानुसार किंमत जास्त

तीस ग्रॅम सोन्याच्या चैनची किंमत आजच्या बाजारभावानुसार साडेचार लाखांपेक्षा जास्त आहे. शहरातील चाळीसगाव रोड, वडजाई रोड सह काही भागात जबरी चोरीचे प्रकार होत आहेत. चोरी- घरफोडीचे गुन्हे पोलिसांकडून उघडकीस येण्याचे प्रमाण चांगले असले तरी चोरीच्या प्रकारांवर आळा घालण्याचे आवाहन पोलिसांसमोर आहे.

### शब्दकोडे क्रमांक : २३९९

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | ■ | ४ | ५ | | ■ | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | | ■ | | ■ | ८ | |
| ९ | १० | ■ | ११ | | | ■ | १२ | | १३ | | ■ |
| ■ | १४ | १५ | | | ■ | १६ | | ■ | १७ | | १८ |
| १९ | ■ | २० | | ■ | २१ | | ■ | २२ | | ■ | |
| २३ | २४ | | ■ | २५ | | ■ | २६ | | ■ | २७ | |
| २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | ■ | ३१ | ३२ | | ■ |
| | ■ | ३३ | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | | |
| ■ | ३६ | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | ■ | | ■ |
| ३९ | | | | ■ | ४० | | | ■ | ४१ | ■ | ४२ |
| | ■ | | ■ | ४३ | ■ | | ■ | ४४ | | | |
| ४५ | | ■ | ४६ | | | ■ | ४७ | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :** १.कृतज्ञता ४.बेफिकीर ७.काक ८.गवताचे पान ९.कालवण ११.वांती १२.नौदल १४.औषधालय १५.सहा दशकांची संख्या १७.श्रीमंत २०.प्रत्येक २१.अधम २२.कलिका २३.तेज २५.न वाकलेला २६.व्यर्थ 27.आनंद २८.सार २९.गोंगाट ३१.खोटे कारण ३३.बसण्याचे लाकडी साधन ३४.कैफ आणणारे ३५.सत्र ३६.परमेश्वर ३७.शेत ३८.इंग्रजीत-चावी ३९.भाऊबीजेला भाऊ बहिणीला देतो ती भेट ४०.नजरेच्या टप्प्यात असलेला ४४.आगाऊ असलेली ठेव ४५.कंकड ४६.दल ४७.हिंदीत-का ? **उभे शब्द :** १.चढ-विरुद्ध २.किनार ३.श्रावण-हिंदीत ५.वेतन ६.लहान आकाराचा बांबू ७.इच्छा ८.शिकार १०.हाक ११.लाकडाचे गोदाम १२.अष्ट १३.मासे १५.वाहून नेणारा १६.सर्प १८.रोख १९.वर्तन २१.धडा २२.अंदाज २४.तीळ २५.धातूचा बारीक तंतू २७.मजदुरी २९.दुःख ३०.काटकसरीने जमा केलेल्या बचतीतून केलेला खर्च ३२.उठ-विरुद्ध३३.वेंधळा ३४.मावशीच्या नात्यातला ३६.एक मराठी सिनेमा ३९.पहचान ४१.गाय ४२.अविरत ४३.धीम्या गतीचा


### शब्दकोडे क्रमांक : २३९८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शं | भ | र | ■ | मा | र | वा | ■ | ह | ■ | वे | द |
| क | ला | ■ | सा | व | ज | ■ | मा | ल | क | ■ | वा |
| र | ■ | का | ज | ळ | ■ | रा | ■ | च | ल | न | ■ |
| पा | त | क | ■ | ता | ज | म | हा | ल | ■ | र | त |
| ळी | ■ | वी | ट | ■ | व | ■ | ल | ■ | मा | क | ड |
| ■ | वा | ■ | प | थ | ■ | जा | ■ | क | स | ■ | क |
| त | र | का | री | ■ | भा | न | ग | ड | ■ | हो | ■ |
| ■ | स | ल | ■ | खा | स | ■ | र | क | म | ■ | आ |
| अ | ■ | व | री | स | ■ | स | म | ■ | स | म | ज |
| धो | र | ण | ■ | दा | ल | न | ■ | बो | ल | का | ■ |
| ग | वा | ■ | हि | र | वा | ■ | बा | ब | त | ■ | सां |
| ती | ■ | जा | त | ■ | द | या | ■ | डा | ■ | रा | ज |










## जोयदा येथे शेळी, बोकडांचा फडशा; परिसरात दहशत पसरली

शिरपूर, दि.२८ (का.प्र.) : तालुक्यातील जोयदा गावाजवळ कृष्णानगर वस्तीवर वन्य पशूंनी हल्ला करुन चार बोकड व एक शेळी अशा पाच प्राण्यांचा फडशा पाडला. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली आहे.

भागडा सुरभान पावरा यांनी शेतीसोबत जोडधंदा म्हणून शेळ्या व बोकड पाळले आहेत. त्यांच्यासाठी कुडाचे घर तयार केले आहे. २७ जूनला पहाटे तीन ते चारच्या दरम्यान वन्य पशूंनी कुड तोडून आत प्रवेश केला. तेथून एक शेळी व चार बोकडांना बाहेर ओढून नेले. त्यांना ठार करुन अर्धवट मांस खाऊन पशूंनी पळ काढला. हे नुकसान सुमारे ५० हजार रुपयांचे आहे. याबाबत माहिती मिळताच वनविभाग व महसूल विभागाच्या प्रतिनिधींनी भेट देऊन पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

वीज पडून बैल ठार : जोयदा येथील पवनखुटी परिसरातील शेतात वीज पडून बैठ ठार झाला. ही घटना २७ जूनला सायंकाळी सहाला घडली. केसरसिंह तिख्या पावरा हे मशागतीसाठी शेतात गेले होते. मशागत पूर्ण करुन घरी परत येण्याच्या बेतात असतांना अचानक पाऊस सुरु झाला. विजांचा लखलखाट होऊ लागल्याने सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यासाठी जात असतांना एका बैलावर अचानक वीज कोसळली. या घटनेत तो जागीच ठार झाला.




# स्पर्धा परीक्षा, शिक्षण भरती प्रक्रियेतील गोंधळाच्या विरोधात काँग्रेसचे आंदोलन

**नंदुरबार,दि.२८ (प्रतिनिधी) - नीट परीक्षा, टीईटी पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, सरकारी संस्थांचे खासगीकरण आणि वाढती महागाई या प्रश्नांवर केंद्र व राज्य सरकारवर तीव्र टीका करत माजी मंत्री ॲड. पद्माकर वळवी यांनी पत्रकार परिषदेत सरकारच्या धोरणांवर निशाणा साधला. येथील विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेला जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दीपक पटेल, ॲड. रोशन गावित, विक्रमसिंग पाडवी, पंडितराव पवार, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

ॲड. पद्माकर वळवी म्हणाले की, नीट परीक्षा रद्द झाल्यामुळे २२लाख विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले. विद्यार्थ्यांचा अभ्यास, वेळ आणि लाखो रुपयांचा खर्च वाया गेला असून, मानसिक तणावामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना घडत आहेत. कोटा येथे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी राहुल गांधी यांनी रॅली काढून विद्यार्थ्यांच्या भावना व्यक्त केल्या, असेही त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या काळात विविध भरती परीक्षा, पेपरफुटी आणि घोटाळ्यांच्या घटना सातत्याने घडत असून, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी याची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली. अभियंता पदवीधरांनाही मजुरी करण्याची वेळ आली असून, सरकारी भरती प्रक्रिया ठप्प आहे. करार पद्धतीच्या भरतीमुळे गुणवंत आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांचे भवितव्य धोक्यात आले आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

काँग्रेस सरकारने उभारलेल्या अनेक सरकारी संस्था केंद्र सरकार खासगीकरणाच्या माध्यमातून संपवत असल्याचा आरोप करत, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रात सरकारी जबाबदारी कमी केली जात असल्याचे ते म्हणाले. टीईटी पेपरफुटी, रक्त तपासणीसारख्या आरोग्य सेवांचे खासगीकरण आणि शिक्षण व्यवस्थेतील अपयशामुळे सामान्य नागरिकांना मोठा फटका बसत आहे, असे त्यांनी नमूद केले.

नगरपालिका व जिल्हा परिषद शाळांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असून, भरती प्रक्रियेतील विलंबामुळे विद्यार्थी व बेरोजगार तरुणांचे भविष्य अंधारात ढकलले जात आहे. एवढ्या गंभीर घटनांनंतरही जबाबदारी स्वीकारून कोणीही राजीनामा देण्यास तयार नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

महागाईमुळे गरीब व सर्वसामान्य नागरिकांचे जीवन कठीण झाले असून, जनतेच्या प्रश्नांसाठी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून धरणे आंदोलनासह तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.




# अमरिशभाई पटेल सी.बी.एस.ई स्कूल इंटर इन्स्ट्रुमेंटल बँड स्पर्धा संपन्न

**शिरपूर, दि. २८(प्रतिनिधी)- अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये दि. २७ जून २०२६ शनिवार रोजी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी इंटर हाऊस इन्स्ट्रुमेंटल बँड स्पर्धेचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत चारही हाऊसमधील जवळपास पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

एम्बर हाऊस, एमराल्ड हाऊस, सफायर हाऊस आणि रुबी हाऊस या चारही गटांनी विविध वाद्यांच्या माध्यमातून उत्कृष्ट संगीत सादर करत आपल्या संघभावना, तालबद्धता आणि कलात्मकतेची प्रभावी छाप पाडली. संपूर्ण परिसर सुरेल संगीताने भारावून गेला आणि स्पर्धा आनंद, उत्साह व चैतन्यपूर्ण वातावरणात पार पडली.

या स्पर्धेसाठी योगेश गुरव यांनी परीक्षक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे बारकाईने परीक्षण केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सफायर हाऊस, द्वितीय एम्बरल्ड, तृतीय एम्बर, व चतुर्थ रुबी हाऊस त्यांनी बाजी मारली. सहभागी सर्वच विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे तोंडभरून कौतुक करत संगीत क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीचे आणि संगीतप्रेमाचे विशेष कौतुक केले.

शिरपूर एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट करत स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षक व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मोहम्मद जैद यांची मागणी
# टीईटी पेपर फुटला कठोर कारवाई करा

**धुळे, दि.२७- हाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा टीईटीच्या प्रश्नपत्रिका फुटल्याची घटना अत्यंत गंभीर असून, यामुळे लाखो विद्यार्थी, पालक आणि राज्यातील जनतेचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. अनेक वर्षे मेहनत घेणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या या प्रकाराचा वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया, धुळे जिल्ह्याच्या वतीने आम्ही तीव्र निषेध करीत असल्याचे पत्रक वेल्फेअर पार्टी ऑफ इंडियाने प्रसिद्धीस दिले आहे.**

राज्यात वारंवार होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. अशा गैरप्रकारांमुळे भ्रष्टाचाराला चालना मिळते आणि गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. त्यामुळे या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर व तातडीने कारवाई होणे अत्यावश्यक आहे. पेपरफुटी प्रकरणाची विशेष तपास पथक मार्फत किंवा सक्षम स्वतंत्र यंत्रणेमार्फत वेळबद्ध चौकशी करण्यात यावी. या गैरप्रकारातील सूत्रधार, संबंधित अधिकारी, कर्मचारी व इतर सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या प्रकरणात निष्काळजीपणा किंवा संगनमत आढळणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. पुनर्नियोजित टीईटी परीक्षा पूर्णपणे पारदर्शक, कॉपीमुक्त वातावरणात घेण्यात यावी. भविष्यात कोणत्याही स्पर्धा परीक्षेची पेपरफुटी होऊ नये यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि प्रश्नपत्रिका वितरणाची सुरक्षित यंत्रणा विकसित करण्यात यावी. परीक्षा पुढे ढकलल्यामुळे विद्यार्थ्यांवर कोणताही आर्थिक किंवा मानसिक भार पडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करून नवीन परीक्षा दिनांक तातडीने जाहीर करण्यात यावा.

# अनिल कुवर यांची जिल्हाध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी ठाकरेंची निवड

**शहादा,दि.२८ (का.प्र.) - नंदुरबार जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ची महत्त्वपूर्ण जिल्हा कार्यकारिणी बैठक नंदुरबार येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहात पार पडली. या बैठकीत पक्षाच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी अनिल कुवर तर युवक जिल्हाध्यक्षपदी बापू ठाकरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यासोबतच जिल्हा प्रतोदपदी भीमराव अहिरे आणि ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अशोक शिरसाठ यांची निवड जाहीर करण्यात आली असून नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**



रिपाईचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी अध्यक्ष रमेश मकासरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या जिल्हा कार्यकारिणी बैठकीला रिपाई आठवले गटाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष वाल्मीक दामोदर, कार्याध्यक्ष शशिकांत वाघ, धुळे जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव, महासचिव राजू शिरसाठ, भरत जाधव, डॉक्टर भूषण पाटील, खान्देश विभाग प्रमुख लक्ष्मण जाधव, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष रामभाऊ माणिक, धुळे जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटोळे, शिंदखेडा तालुकाध्यक्ष कैलास आखाडे, शहादा तालुकाध्यक्ष प्रकाश सामुद्रे, भिकालाल ढोढरे, अक्कलकुवा तालुकाध्यक्ष बापू महिरे, शहादा येथील नरेंद्र कुवर, संतोष कुवर, बापू घोडराज, प्राध्यापक चंद्रविलास बिराडे, साहेबराव बिरारी, प्रकाश गुलाले, राजू बिरारी, सुशील बैसाणे आदी मान्यवर आणि जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बैठकीला मार्गदर्शन करताना प्रदेश उपाध्यक्ष रमेश मकासरे म्हणाले की, नंदुरबार जिल्ह्याची ही नवीन कार्यकारिणी रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री माननीय ना. रामदासजी आठवले यांच्या सूचनेनुसार आणि आदेशानुसार जाहीर करण्यात आली आहे. निवड झालेल्या नूतन अध्यक्षांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून पक्ष वाढीसाठी व बळकटीकरणासाठी काम करावे. समाजातील वंचित आणि शेवटच्या घटकाला न्याय मिळेल अशा पद्धतीने सर्वांना सोबत घेऊन काम करावे, याच उद्देशाने ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देणार: अनिल कुवर

नूतन जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर अनिल कुवर यांनी पक्षाचे आभार मानताना सांगितले की, नंदुरबार जिल्ह्यात नेहमीच दलित व आदिवासी संघटनांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मी प्रयतक केला आहे, याच कामाची दखल घेऊन पक्षाने माझ्यावर हा विश्वास टाकला आहे. पक्षाचे राष्ट्रीय नेते आदरणीय रामदासजी आठवले, राज्य उपाध्यक्ष रमेश मकासरे, रामभाऊ माणिक आणि धुळे-नंदुरबार जिल्ह्यातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन व जिल्हाभरात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नेहमी तत्पर राहीन, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# आ. राम भदाणेंच्या हस्ते मुलांना प.पोलिओचा डोस

**धुळे, दि.२८ - रविवारी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत लोकप्रतिनिधींनीही पुढाकार घेतला. धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी स्वतःच्या मुलाला सोबत घेऊन केंद्रावर जात पोलिओ डोस पाजला. दोन थेंब प्रत्येक वेळी - पोलिओवर विजय दरवेळी, असे मत व्यक्त करीत पालकांना लसीकरणासाठी आवाहन केले.**

रविवारी सकाळी धुळे शहरातील आरोग्य केंद्रात आमदार भदाणे सपत्नीक मुलासह दाखल झाले. त्यांनी आपल्या चिमुकल्याला आरोग्य सेविकेकडून पोलिओचा डोस पाजवला. यावेळी उपस्थित पालकांशी संवाद साधताना ते म्हणाले, पोलिओ निर्मूलनासाठी शासन कटिबद्ध आहे. मात्र, पालकांच्या सहकार्याशिवाय हे शक्य नाही. पाच वर्षांखालील एकही बालक डोसपासून वंचित राहू नये. मदोन थेंब प्रत्येक थेंबावर विजयफ हे ब्रीदवाक्य लक्षात ठेवून प्रत्येकाने आपल्या बाळाला केंद्रावर आणावे. आजपासून पुढील पाच दिवस आरोग्य विभागाची पथके घरोघरी जाऊन लसीकरण करणार आहेत. बूथवर न येऊ शकलेल्या बालकांना घरीच डोस दिला जाईल, असेही भदाणे यांनी सांगितले.

यावेळी आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते. आमदारांनी स्वतः मुलाला डोस पाजल्याने इतर पालकांमध्येही उत्साह दिसून आला.



# शहादा पल्स पोलिओ मोहिमेला प्रतिसाद शहरात सत्तावीस ठिकाणी लसीकरण सुरु

**शहादा, दि.२८ (का.प्र.) - शहादा तालुका प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नगरपालिका प्रशासनाच्या वतीने शहादा शहर व ग्रामीण भागात रविवारी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. तालुक्यातील पाच वर्षांखालील एकूण ४४ हजार ७४८ बालकांना पोलिओचा डोस पाजण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, पहिल्याच दिवशी विविध केंद्रांवर पालकांनी बालकांना डोस पाजण्यासाठी मोठी गर्दी केली होती. रविवारी सुटलेल्या बालकांसाठी आता सोमवार ते बुधवार या तीन दिवसांत घरोघरी जाऊन अभियान राबवले जाणार आहे.**

या मोहिमेसाठी शहादा शहर आणि ग्रामीण भागातील एकूण ९३ हजार २७१ घरांचा सर्व्हे करण्यात आला असून, डोस पाजण्यासाठी ३१६ पथके (टीम्स) तयार करण्यात आली आहेत. यामध्ये ८१४ कर्मचारी आणि ६५ सुपरवायझर कार्यरत आहेत. शहादा शहरात एकूण २७ केंद्रांवर ही मोहीम राबविण्यात आली, ज्यामध्ये पालिकेच्या सर्व १४ प्रभागांचा समावेश होता. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालयामार्फत सर्व आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दोन दिवस आधीपासूनच ग्रामीण रुग्णालय व पालिकेतर्फे यासाठी व्यापक जनजागृती करण्यात आली होती.

शहरातील लोणखेडा बायपास रस्त्यालगत असलेल्या गोकर्णेश्वर महादेव मंदिर परिसरातील केंद्राला शहादा विधानसभेचे आमदार राजेश पाडवी यांनी भेट देऊन पाहणी केली. या केंद्रावर शहादा नगरपालिकेच्या नगरसेविका ममता हेमराज पवार आणि आमदार महोदयांचे स्वीय सहाय्यक हेमराज पवार यांच्या हस्ते बालकाला पोलिओचा डोस पाजून मोहिमेचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रवासी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर पाटील उपस्थित होते. प्रभाग क्रमांक १४ मध्ये गणेश पाटील यांच्या निवासस्थानी पोलिओ लसीकरण केंद्र होते. या ठिकाणी नगरसेविका सरिता पाटील यांनी बालकाला डोस दिला. गणेश पाटील यांनी या केंद्रावर सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या व मोहीम संपेपर्यंत ते स्वतः या ठिकाणी लक्ष ठेवून होते. यासोबतच, शहादा नगरपालिकेचे मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांनीही शहरातील विविध लसीकरण केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देऊन सुरू असलेल्या कामकाजाची पाहणी केली.

**CHANGE NAME**

Old Name Was
**SHIKALIKAR SOHAIL HARUN**
New Name Is
**SHIKALGAR SOHAIL HAROON**
Add : Plot No. 44, Chalisgaon Road, Avishkar Colony , Dhule.

**SATGURU PUBLIC SCHOOL**
**(English Medium Residential School)**
Teachers are required for below post
PRT- Primary teacher
TGT- Marathi/English/Maths/Science
* Candidates must be fluent in English
* Freshers can also apply
* Pickup and drop facility available for female teacher's
**Contact : 9850731636, 9112453988**
Address: Satguru Public School, Near Naval nagar, Dhule.
**PRINCIPAL**
**SATGURU PUBLIC SCHOOL**

**CHANGE NAME**

I Have Changed Of My Name From
**AFSANA BI BASHIR MALAK**
To .
**AFSANA BANO SATTAR SHAIKH**
Add : O Agra Road Len No. 6 Devpur Sushi Nala Dhule- 424002.

**CHANGE NAME**

I Have Changed Of My Name From
**NASREEN BANO SALIM AHMAD**
To .
**NASREEN BANO SHAIKH SALEEM**
Add : Plot No. 5, Near Khatik Bhavan, Mohammadi Nagar Deopur Dhule- 424002.

**CHANGE NAME**

I Have Changed Of My Name From
**YASMEEN BANO SHAMSHER KHAN**
To .
**SALMA BI ERFAN SHEKH**
Add : Sakri Road Motinala Pulajaval G N 06 Moglai Dhule- 424001.

**CHANGE NAME**

I Have Changed Of My Name From
**ANJUM AARA ABDULLA BAIG MIRZA**
To .
**ANJUM BI ASADULLA KHAN**
Add : 239 Mohammadi Nagar, Mohammadi Masjid Javal, Deopur Dhule- 424002.

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ४७३/२०२६
नि. नं.

**१) उषाबाई मच्छिंद्र भिल, २) भरत मच्छिंद्र भिल,**
**३) वैशाली अंकुश पाटील** रा. कळमसरे ता. शिरपूर जि. धुळे .. अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार
**कै. मच्छिंद्र रतन भिल** (मृत्यू दिनांक २१/०९/२०१०)
मृत्यू ठिकाण कळमसरे ता. शिरपूर जि. धुळे ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नंबर नं. १ ते ३ हे मयत कै. मच्छिंद्र रतन भिल यांचे वर अर्जदार हे मुलगा व मुलगी असे कायदेशीर वारस म्हणून, अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम १८२७ सेक्सन २ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरिक्त जे कोणी वारस असतील त्यांनी या मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. २९/०६/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदार नं. १ ते ३ यांच्या तोंडी पुरावा घेवून त्या आधारे मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार नं. १ ते ३ यांनी केलेल्या मागणी प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिल असे.

सही.... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस

नि. ६

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५१०/२०२६

**संगीता अनिल माळी** .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत मंजुळाबाई नथा माळी हे. दि. १२/०५/२०२२ रोजी मौजे वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही. असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २५/०६/२०२६
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मा. न्यायदंडाधिकारी सो. प्रथम वर्ग यांचे कोर्टात**

फौज. कि. अर्ज नं. २९४/२०२५
पु. ता. ०९/०७/२०२६
निशाणी क्र. /ड

**आरती किसन पवार वगैरे** .. अर्जदार

विरुद्ध

**किसन मोजीलाल पवार वगैरे** ... जाबदेणार

ज्याअर्थी वरील अर्जदार हिने महिलांचे घरगुती अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १६, १८, १९, २० व २२ अन्वये या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

वर नमूद अर्जातील सामनेवाला क्र. ०१ किसन मोजीलाल पवार यांना सदर नोटीस काढण्यात आली होती. परंतु सदर सामनेवाला क्र. ०१ किसन मोजीलाल पवार यांना जाहीर नोटीस काढण्यात येते की,

ज्याअर्थी जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,वरील सामनेवाला क्र. १ किसन मोजीलाल पवार यांना सदर अर्जात काही म्हणणे सादर करावयाचे असल्यास त्यांनी शिरपूर येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो.क. स्तर तथा न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात दि. ०९/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकीलामार्फत हजर रहावे.वरील प्रमाणे आपण करण्यास चुकल्यास तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काही एक हरकत नाही. असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहीर नोटीस कोर्टाच्या सहिशिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.
शिरपूर दि. २४/०६/२०२६

सही.... सही...
**क. लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
न्यायदंडाधिकारी न्यायालय, प्र. वर्ग शिरपूर न्यायदंडाधिकारी न्यायालय, प्र. वर्ग शिरपूर

## जाहीरनामा-नोटीस

**शिरपूर येथील म. तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

मृत्यू नोंद अर्ज नं. /२०२६

**दिपक सुरेश भिल**
रा. सावेर ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**म. ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत,सावेर-गोदी, ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

अर्जदाराची आजी नामे सुपाबाई दशरथ भिल यांचा मृत्यू दि. ०९/०८/१९८६ रोजी मौजे सावेर ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा मृत्यू दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२) (३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा मृत्यू दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसासंबंधी कुणाची काही हरकत/आपेक्ष असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपण स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी वा वकीलामार्फत म. तहसिलदार सो. शिरपूर जि. धुळे यांचे कोर्टात हजर राहून आपली हरकत/आक्षेप नोंदवावी. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि. २५/६/२०२६ ठिकाण : शिरपूर

**ॲड. ज्योत्सना एन. गिरासे**
३२ ए. विद्याविहार कॉलनी, शिरपूर **मो. ७७४३८४३८४८**

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु.डि. यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ५४२/२०२६

**१) निहाल अहमद जमील अहमद मन्यार**
रा.घर नं.२५४१, जैन गल्ली, मनियार मस्जिद जवळ,शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे
**२) सुहेल अहमद जमील अहमद खान**
प्लॉट नं.४८,स्वामी समर्थ मंदिर जवळ,सरस्वती कॉलनी,शिरपूर ता.शिरपूर जि. धुळे
**३) शाकेराबी रफीक खान मन्यार**
रा. प्लॉट नं. ४, नगरपालिका मंगल कार्यालय जवळ, हजरत अली चौक चाळीसगांव जि. जळगांव
**४) पठाण जाकेरा बी नासिर खान** रा. चिराग अली लेन, नंदुरबार ता. जि. नंदुरबार
**५) सुलताना मोहसिन पठाण,**
रा.प्रकाशा रोड, बागवान गल्ली, शहादा ता. शहादा जि. नंदुरबार.... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत जमील अहमद खान मुसाखान मन्यार हे दि. ०२/०५/२०२६ रोजी व सईदा बी जमील अहमद खान ह्या दि. २९/०६/२०२५ रोजी मौजे सरस्वती कॉलनी, ता. शिरपूर धुळे येथे मयत झाले असून, आता अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या दि. २३/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे

सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २४/०६/२०२६
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीरनामा-नोटीस

**शिरपूर येथील म. तहसिलदार सो. तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

मृत्यू नोंद अर्ज नं. /२०२६

**दिपक सुरेश भिल**
रा. सावेर ता. शिरपूर जि. धुळे ... अर्जदार

विरुद्ध

**म. ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत,सावेर-गोदी, ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

अर्जदाराचे आजोबा नामे दशरथ फुला भिल यांचा मृत्यू दि. २५/१०/१९८२ रोजी मौजे सावेर ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा मृत्यू दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ उपकलम (२) (३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा मृत्यू दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसासंबंधी कुणाची काही हरकत/आपेक्ष असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपण स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी वा वकीलामार्फत म. तहसिलदार सो. शिरपूर जि. धुळे यांचे कोर्टात हजर राहून आपली हरकत/आक्षेप नोंदवावी. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि. २५/६/२०२६ ठिकाण : शिरपूर

**ॲड. ज्योत्सना एन. गिरासे**
३२ ए. विद्याविहार कॉलनी, शिरपूर **मो. ७७४३८४३८४८**

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (ज्युडि.) यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ८३/२०२६

**१) मदिना भिकन खाटीक**
रा. पाष्टे, ता. शिंदखेडा जि. धुळे .... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही .... जाबदेणार
कै. जाफर जुमा खाटीक (मयत) (मृत्यू ता. २५/०३/१९८०)
रा. हिसाळे ता. शिरपूर जि. धुळे

ज्याअर्थी मयत कै. जाफर जुमा खाटीक (मयत) हे दि. २५/०३/१९८० रोजी मौजे हिसाळे ता. शिरपूर धुळे येथे मयत झाले असून, आता अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार मुलगी एकमेव मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधीतांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या दि. २४/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २४/०६/२०२६

**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## पान १ वरुन

## संयम सुटला तर इराणचे अस्तित्व राहणार नाही

ड्रोन तळांवर हल्ले केले. हे लोक कधीच सुधारणार नाहीत असे दिसतेय. एकवेळ अशी येईल जेव्हा आमचा संयम सुटेल आणि आम्ही सुरू केलेले लष्करी अभियान पूर्ण करण्यास आम्ही भाग पडू. जर असे घडले, तर जगात इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणचे अस्तित्वच शिल्लक राहणार नाही.

**हिंसेचे उत्तर हिंसेनेच - जे. डी. व्हान्स**

दुसरीकडे, अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनीही इराणला खडे बोल सुनावले आहेत. आम्ही कराराचे पालन केले. जर काही मतभेद होते, तर फोनवर चर्चा करायला हवी होती. पण हिंसेचे उत्तर हिंसेनेच दिले जाईल, असे व्हान्स यांनी स्पष्ट केले. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या मालवाहू जहाजावर इराणने ड्रोन हल्ला केल्यामुळे अमेरिकेने ही थेट कारवाई केल्याचे त्यांनी सांगितले.

**इराणचा पलटवार: तसेच उत्तर देणार**

अमेरिकेच्या आक्रमक पवित्र्यामुळे इराण देखील मागे हटलेला नाही. इराणच्या बलाढ्य इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने या हल्ल्याचा तीव्र निषेध करत, या भागातील अमेरिकेच्या लष्करी तळांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणने अमेरिकेला जशास तसे उत्तर देणार असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेच्या नेमक्या कोणत्या तळांचे नुकसान झाले, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

**जागतिक तेल पुरवठ्यावर संकट?**

ताज्या संघर्षामुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा एकदा युद्धाच्या केंद्रस्थानी आली आहे. हा जगातील सर्वात महत्त्वाचा सागरी व्यापारी मार्ग मानला जातो. जेथून जगातील एकूण तेल पुरवठ्याचा मोठा हिस्सा वाहतूक केला जातो. त्यामुळे या संघर्षामुळे जागतिक तेल पुरवठ्यावर संकट येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**राजकीय आरोप-प्रत्यारोप**

इराणचे उपपरराष्ट्र मंत्री काझम घारीबाबादी यांनी अमेरिकेच्या भूमिकेवर टीका करताना म्हटले आहे की, इराणचा किनारी देश म्हणून असलेला हक्क डावलून या सागरी मार्गाची सुरक्षा सुनिश्चित करता येऊ शकत नाही. इराणच्या संसदीय सुरक्षा समितीचे प्रमुख इब्राहिम अझीझी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना अयशस्वी राष्ट्राध्यक्ष संबोधत, या कराराच्या उल्लंघनामुळे शेवटी अमेरिकेलाच माघार घ्यावी लागेल आणि पश्चाताप करावा लागेल, असा इशारा दिला आहे.

## समृद्धी महामार्गावर पाच जणांचा मृत्यु

जागेवरच मृत्यू झाला. या अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये दोन पुरुष, दोन महिला आणि एका लहान मुलीचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस आणि समृद्धी महामार्गाच्या बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास पोलिस करत आहेत.

## विकासासाठी नव्हे खासगी निधीसाठी बंडखोरी

राम मंदिर स्थापन व्हावे अशी सर्व हिंदूंची इच्छा होती. मात्र, भाजपने रामाच्या नावाने दुकान उघडले आहे. कार सेवकांचा संघर्ष देखील भाजपा विसरली. केवळ मंदिराच्या आडून घृणास्पद कामे केली जात आहेत. राम मंदिरातील चोरी म्हणजे एक प्रकारे हिंदुत्वाशी केलेली गद्दारी असल्याचा आरोप यावेळी पक्ष प्रमुख ठाकरे यांनी केला. मागच्या वेळी अतिवृष्टी झाली तेंव्हा आपण स्वत: शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. परंतू यावेळी हा गद्दार आपल्यासोबत नव्हता. केवळ दिखाऊपणासाठी मोर्चात सहभागी झाला होता, अशा शब्दात पक्ष प्रमुख ठाकरे यांनी खा. जाधव यांना बंडखोरीवरून फटकारले.

**अपमान करणाऱ्यांवर विश्वास ठेऊ नका**

पक्षाशी गद्दारी करून इतर पक्षात गेलेले आम्ही विकासासाठी तिकडे गेल्याचे सांगत आहेत. ज्यांनी तुमच्या मताला विकले. तुमच्या मतदानाचा अपमान केला. त्यांच्यावर तुम्ही विश्वास ठेऊ नका. आपल्यात धमक असेल तर आपण विरोधात राहून सुध्दा काम करू शकतो. येथील खासदार जरी पक्ष सोडून गेले असले तरी जिल्ह्यात चारही आमदार निवडून आणल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीत. तुम्ही सत्तेच्या ताकदीवर शिंगाची आणि आरेरावीची भाषा करू नका. जनता आता क्रांतीसाठी रस्त्यावर उतरणार असून यांना जमिनीत गाडल्याशिवाय शांत बसणार नसल्याचा इशारा आ. डॉ. राहूल पाटी यांनी या जाहीर सभेत बोलताना दिला. या जाहीर सभेचे सुत्रसंचलन बाळासाहेब राखे यांनी केले. यावेळी विधानसभा क्षेत्र प्रमुख कल्याणराव रेंगे, जिल्हा प्रमुख विष्णू मुरकुटे, जिल्हा प्रमुख रविंद्र धर्फे, नंदकुमार आवचार, अरविंद देशमुख, सदाशिव देशमुख, संतोष बोबडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## टीईटी पेपरफुटीचे दिल्लीत कनेक्शन

परीक्षा परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेसाठी राज्यभरातून तब्बल चार लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी नोंदणी केली होती. आज या परीक्षेचा पेपर होता. मात्र काल भिवंडीतील कोनगाव पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, काही जण टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका विक्रीसाठी घेऊन येणार आहेत. या माहितीच्या आधारे पोलिस उपायुक्त डॉ. पवन बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सापळा रचून तिघा संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून टीईटी परीक्षेचे चार प्रश्नसंच जप्त करण्यात आले.

**संबंधित आरोपींना अटक**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नपत्रिकांची पडताळणी केली असता त्यातील काही प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेतील प्रश्नांशी जुळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी एक आरोपी हरियाणाचा तर दोन आरोपी बिहारमधील असल्याची माहिती समोर आली आहे.

**पेपरफुटीचे दिल्ली कनेक्शन**

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, हा पेपर दिल्लीहून आणण्यात आला होता आणि त्याचा व्यवहार तब्बल दीड कोटी रुपयांत ठरला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. हा पेपर नेमका कोणाला विकण्यात येणार होता, यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच इतर ठिकाणीही प्रश्नपत्रिका विकली गेली आहे का, याचा तपास सुरू आहे. दरम्यान, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेतल्याचे सांगितले. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. विद्यार्थ्यांना नव्याने अर्ज किंवा शुल्क भरण्याची आवश्यकता नसून परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**तिघांना सहा जुलै पर्यंत कोठडी**

टीईटी पेपरफुटी प्रकरणातील संशयित आरोपी धीरज बलराज सिंग (हरियाणा), राजीव साव (बिहार) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (बिहार) यांना रविवारी भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. या प्रकरणामागे आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय असून दोन संशयित आरोपी अद्याप फरार आहेत. पेपर नेमका कुठून आला, महाराष्ट्रात आणखी कुठे विक्री करण्यात आली का, आर्थिक व्यवहार कोणकोणाशी झाले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने आठ दिवसांची म्हणजेच सहा जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

## मुडावदमध्ये चोरट्यांनी वीज कंपनीचा

संकट ओढवल्याने शेतकरी चिंतेत आहेत. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली आहे. ग्रामीण भागात वाढत्या चोऱ्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी आणि या चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी मुडावद परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

## पान १ वरुन

## गावठी कट्टा बाळगणाऱ्या सुमीत शिंदेला

देवपूर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

**सराईतावर यापूर्वीही गुन्हे**

संशयित सुनील चौधरी याने अंतर्गत वादात वापरण्याच्या उद्देशाने उमर्टी (म. प्रदेश) येथून गावठी कट्टा व काडतुस खरेदी केल्याचे प्राथमिक चौकशीत आढळले. यामुळे भविष्यात होणाऱ्या संभाव्य गंभीर गुन्हयास प्रतिबंध करणेस पोलीसांना यश आले आहे. संशयित सुमित शिंदे याचेविरुध्द यापुर्वी धुळे शहर, देवपूर, आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

**यांनी केली कारवाई**

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, उपनिरीक्षक अमित माळी, हवालदार योगेश चव्हाण, दिनेश परदेशी, प्रल्हाद वाघ, प्रकाश सोनार, आशिषकुमार वानखेडे, अमोल पाटील यांनी केली.

## कलेक्टर व जि.प.मुख्याधिकाऱ्यांच्या हस्ते

निश्चित करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले की, भारताला २७ मार्च २०१४ रोजी पोलिओमुक्त घोषित करण्यात आले असले तरी शेजारील पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये अद्याप पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून देशभरात पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेसाठी जिल्हाभरात १,५०८ लसीकरण केंद्रे उभारण्यात आली असून ३,२६० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ६३ ट्रान्झिट पथके आणि ९१ मोबाईल पथके कार्यरत राहणार आहेत.

जिल्हाधिकारी विसपुते यांनी सांगितले की, २८ जून रोजी सर्व लसीकरण केंद्रांवर बालकांना पोलिओचे दोन थेंब दिले जातील. त्यानंतर पुढील पाच दिवस आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची खात्री करतील. सर्व पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून १०० टक्के लसीकरण मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, मुंबई शहरी विभागाचे संचालक डॉ. प्रसाद भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे, महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अश्विनी भामरे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. विवेक जाधव, डॉ. गीतांजली सोनवणे बाह्य रुग्ण विभाग परिषदेचा प्रतिभा घोडके अनुपमा लोंढे मीना गढरे प्राचार्य भूषण जोशी कमलेश परदेशी अमरजीत पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओरिएंटेशन कार्यक्रम मोठ्या उत्साहात

या कार्यक्रमामध्ये पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेचे प्राचार्य जीवन सपकाळे यांनी यांनी आपल्या प्रस्तावनेत शाळेचे व्हिजन मिशन, नियम व शिस्त, सीबीएससी अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धती, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, अभ्यासाच्या सवयी,पालकांची भूमिका व जबाबदारी, शाळा-पालक संवादाचे महत्त्व,शिक्षक व पालक यांच्यातील ओळख, परीक्षेचे वेळापत्रक, सहशालेय व क्रीडा उपक्रम, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षभरात होणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल माहिती दिली.समन्वयक महेश डिगराळे यांनी शाळेचे कामकाज परिपूर्ण पद्धतीने ऑनलाईन होणाऱ्या हस्ती प्रिज्म अँपची सविस्तर माहिती दिली. तद्नंतर समन्वयिका समिना बोहरी यांनी गृहपाठ आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत व शाळेच्या दैनंदिन कामकाजाची माहिती देत पालक आणि शिक्षक यांच्यात सातत्यपूर्ण संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षकांनी विविध विषयांच्या अध्यापन पद्धती, मूल्यमापनाची माहिती दिली. पालकांनीही आपल्या शंका मांडल्या असून त्यांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.

यावेळी उपस्थित पालकांपैकी विविध पालकांनी आपले मत मांडले त्यात त्यांनी म्हटले की, मुंबई - नाशिक शहरातील शिक्षण पद्धती ही हस्ती वर्ल्ड स्कूल दोंडाईचा येथे आपल्या पाल्याला देत आहे, शिक्षणसोबत इतरत्र स्पर्धांमध्ये व उपक्रम उपस्थित करत मुलांना सर्वगुण संपन्न बनविले जात आहे. पालकांनी आपल्या मुलांना घरी वेळ देऊन त्यांना अवांतर वाचन करण्याचे सवय लावावी असे प्रतिपादन अनेक पालकांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी पालकांनी शाळेच्या उपक्रमांचे व नियोजनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेसोबत कायम सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. पालक-शिक्षकांच्या सुसंवादातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा ओरिएंटेशन कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

## राजर्षी छ. शाहू महाराजांचे विचार राज्यकर्त्यांना

प्रभाकर शेळके, डॉ. एस. ए. पाटील, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात चे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, डॉ. प्रवीण महाले यांचे सह साहित्य, इतिहास व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. शासकीय जिल्हा ग्रंथालयाच्या सभागृहात छत्रपती शाहू महाराज आणि स्वर्गीय पद्म राजे कदमबांडे यांच्या तसबीरीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते, इतिहास संशोधक डॉ. नरसिंहजी परदेशी यांनी छत्रपती शाहू महाराज व खानदेश : सामाजिक व राजकीय संबंध या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. ते म्हणाले, राजर्षी शाहू महाराज हे बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी भरीव कार्य हे कमी राजे होते. आरक्षणाची संकल्पना, शिक्षणासाठी घेतलेले निर्णय तसेच खानदेश प्रदेशाशी असलेले ऐतिहासिक संबंध यांचा संदर्भासह ऊहापोह केला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या तिथीनुसार जयंती निमित्त चिन्मय शेळके यांनीही प्रभावी भाषेत आपले विचार व्यक्त केले. ते ते म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली तर स्वराज्य रक्षणासाठी अनेक यातनासह करीत बलिदान देणारा एकमेव राजा म्हणून संभाजी महाराजांकडे बघितले पाहिजे. इतिहास संशोधक डॉ. अनिल बैसाणे यांनी देखील छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचा आढावा घेत म्हणाले, की पुरोगामी महाराष्ट्राचा पाया शाहू महाराजांनी रचला आणि तो पुढे महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक नेत्यांनी पुढे समृद्ध केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र वाणी वाणी, प्रो. डॉ. योगेश पाटील, ग्रंथपाल, डॉ. वाय. एन. पाटील, प्रा. सुनील पाटील, ग्रंथपाल, डॉ. विजय जाधव यांचे सह साहित्य भारती व महाराष्ट्र साहित्य परिषदच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शशिकला पवार, सूत्र संचलन डॉ. वाल्मीक आढावे, आभार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी यांनी मानले.

## पटेल माध्य. विद्या.त एसटी पासचे वितरण

योगेश धनगर यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या प्रसंगी मुख्याध्यापक डी. के. चौधरी, विभाग प्रमुख किशोर भोई, वाहतूक नियंत्रक योगेश धनगर, सर्व शिक्षक, कर्मचारी वृंद, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मावजीपाड्याच्या टॉवरवरून ७५ ह.च्या

ता. नंदुरबार), घनश्याम रविंद्र अहिराव (रा. टिटाणे ता. साक्री) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. सहाय्यक उपनिरीक्षक के. एफ. शेख तपास करीत आहेत.

## आ.अमरिशभाई पटेल व पदाधिकाऱ्यांनी

पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी कार्यक्रम मनोभावे ऐकत पंतप्रधानांनी मांडलेले विचार प्रेरणादायी असल्याचे सांगितले. समाजहितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये अधिकाधिक लोकसहभाग वाढविणे, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता अभियान आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला.

## निधन वार्ता

## एकशेतीन वर्षाच्या मानाबाई चौधरी




नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- शहरातील देसाईपुरा, कुंभार गल्ली, भागातील रहिवासी श्रीमती मानाबाई चिंधू चौधरी यांचे वयाच्या १०३ व्या वर्षी रविवार २८ जून रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना,मुलगी, जावई, नातवंडे, पंतवंडे, नातसुना, असा मोठा परिवार आहे. नंदुरबार नगर पालिकेचे माजी नगरसेवक ईश्वर चिंधू चौधरी आणि महेंद्र चिंधु चौधरी यांच्या मातोश्री तसेच एनटीव्हीएस शाळेचे शिक्षक विजय ईश्वर चौधरी यांच्या आजी होत्या. दरम्यान श्रीमती मानाबाई चौधरी यांची अंत्ययात्रा आज सोमवार दि. २९ जून रोजी सकाळी १० वाजता देसाईपुरा, कुंभार गल्ली भागातील राहत्या घरापासून निघणार आहे.

## कमलबेन चौधरी



शहादा, दि.२८ - तालुक्यातील कवठळ (ह.मु. वृंदावन नगर) येथील गं. भा. कमलबेन दामू चौधरी (७४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या शहादा येथील शेठ व्ही. के.शहा विद्यालयाचे पर्यवेक्षक विपीन दामू चौधरी, कहाटूळ येथील के.वाय आर.पाटील माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक नितीन दामू चौधरी यांच्या आई होत.



## ईव्हीएम अॅप वर मतदान करत विद्यार्थ्यांनी निवडले वर्ग प्रतिनिधी

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- एकलव्य विद्यालयातील इयत्ता १० वी क च्या विद्यार्थ्यांनी अँप वर मतदान करून आपले वर्ग प्रतिनिधी निवडून नवीन अनुभव प्राप्त केला.**

शालेय जीवनात वर्ग प्रतिनिधी बनण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चढाओढ लागलेली असते व त्यासाठी वर्गावर्गात निवडणूक होते. बऱ्याच वेळा ही निवडणूक चिट्ठी वर मतदान करून होते परंतु एकलव्य विद्यालयाच्या इयत्ता १० वी क च्या वर्गात आज नवीन प्रयोग राबविण्यात आला. मोबाईल वर उपलब्ध असलेल्या वोटिंग मशीन अँप वर मतदान घेऊन विद्यार्थी प्रतिनिधी निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी हा एक नवीन अनुभव होता. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया कशी चालते याचा त्यांना अनुभव देण्यासाठी वरील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवडणुकीच्या सुरुवातीला वर्गशिक्षक संतोष पाटील यांनी विद्यार्थ्यांना मतदान कसे करावे याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांसमोर इच्छुक उमेदवारांचे नाव मतदान यंत्रात टाकण्यात आले. निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक धर्मेंद्र मराठे, उप मुख्याध्यापक डॉ गिरीश पवार, पर्यवेक्षक टिका पाडवी यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत ज्याप्रमाणे मतदाराला मतदान केंद्रात वागावे लागते त्याच पद्धतीचा अनुभव विद्यार्थ्यांना देण्यात आला.

आजच्या या निवडणूक प्रक्रियेमुळे एक नवीन अनुभव मिळाल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली. या निवडणुकीत विद्यार्थिनींमधून श्वेता पवार, रिद्धीमा मालचे, राधिका भोये व रिषिका राव यांनी उमेदवारी केली. त्यातून श्वेता पवार वर्ग प्रतिनिधी तर रिद्धिमा मालचे उपप्रतिनिधी म्हणून निवडून आल्या. मुलांमधून श्रेयस बोरसे, दुर्गेश माळी, हर्ष काळे व स्वप्निल वाघ यांनी उमेदवारी केली त्यातून श्रेयस बोरसे वर्ग प्रतिनिधी म्हणून तर दुर्गेश माळी उपप्रतिनिधी म्हणून निवडून आले.

## पिंपळादेवी विद्यालयात छ.शाहू महाराज जयंती

धुळे, दि.२८- शहराच्या मोहाडी उपनगर येथील श्री पिंपळादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती, सामाजिक न्याय दिन व जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. एस. पाटील होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहाडी उपनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नितिन करंडे, पोलीस हेड कांस्टेबल निलेश पाटील, मयूर गुरव, नरेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस उपनिरीक्षक नितिन करंडे यांनी आपल्या जीवनात ध्येय ठेवावे व ते पूर्ण करावे, जीवनात कोणतेही वाईट व्यसन करू नका. विद्यार्थ्यांनी जीवनात चांगल्या गोष्टींचे व्यसन करा, आवाहन केले. श्रीमती एस. बी. सोनवणे यांनी शाहू महाराजांच्या जीवन कार्याची माहिती सांगितली. एस. एन. सोनवणे यांनी अंमली पदार्थांचे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन केले.


**पाहिजेत**

श्री.अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळ, धुळे संचलित अग्रवाल विश्राम भवन, नदी किनारी, शिवाजी रोड, धुळे. येथील कामासाठी कर्मचारी भरती करावयाची आहेत. तरी ईच्छुकानी खालील पदानुसार अर्ज करावे.

१) सुपरवायजर- ०४ पदे
२) स्विपर (सफाई कर्मचारी) - ०२ पदे
३) सह व्यवस्थापक - ०१ पद
४) वॉचमेन- ०२ पदे (परिवारसह राहण्यासाठी)

कृपया वरील पदांसाठी ईच्छुक उमेदवारानी वरील संस्थेत अर्ज करावे. संस्थेच्या निवास स्थानात राहणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

व्यवस्थापक
मो.नं.9834332117, (02562) 359374

**पाहिजेत**

Thancos Natural Icecream
Part Time/ Full Time - मुले व मुली
कॅफे, आईस्क्रीम पार्लरमध्ये कामाचा अनुभव आवश्यक
बेसिक कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
पत्ता : जयहिंद कॉलेज रोड, देवपूर, धुळे
इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा : 9270492404

**भाड्याने देणे आहे**

डोंगरे महाराज नगर
कानुश्री पहिला मजला, Solar सहीत,
२४ तास पाणी,
भाडण्याने देणे आहे.
: संपर्क :
9822545666

**WANTED**

Clever & Experience Holder Pharmacist
Pay 13000/-
9823833108

**पाहिजे**

दै. आपला महाराष्ट्रच्या नवीन आवृत्तीसाठी संपादकीय विभागाचे ज्ञान व दैनिकाचे स्वत: पाने लावू शकणारा होतकरु उपसंपादक लावणे आहे.
-: संपर्क :-
9422286496

**पाहिजेत**

कंम्पाऊंड जाळी कारखान्यात कामासाठी मेहनती होतकरु महिला व पुरुष पाहिजेत.
वय - २० ते ४५
समक्ष भेटा- ११ ते ५
वाखारकर नगर, नटराज टॉकीजच्या मागे, जलाराम मंदीर जवळ, धुळे
9404578686

**प्रवेश सुरु २०२६-२७**

क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव यांच्या संलग्नतेने सत्कार्योत्तेजक सभेचे भारतीय विद्या संशोधन केंद्र, रामवाडी धुळे येथे खालील अभ्यासक्रमाचे प्रवेश देणे सुरु आहे.

१. पी.जी.डिप्लोमा इन गायडन्स अँण्ड कौन्सीलींग - १ वर्ष
२. ज्येष्ठांचे मानशास्त्र व समुपदेशन - ६ महिने
३. संस्कृत भाषा परिचय आणि संभाषण कौशल्य - ६ महिने
४. Certificate Course in Communicative English - ३ महिने
५. प्रमाणपत्र अभयासक्रम- मोडीलिपी - ३ महिने

अखिल भारतीय कीर्तन संस्था दादर यांच्या
१. कीर्तनालंकार पदवी अभयासक्रम - साडेतीन वर्ष

जागा मर्यादित आहे. आपला प्रवेश आजच निश्चित करा.
संपर्क :- डॉ.एन.एम.जोशी
9421500882, 9146768700, 9623143714

**पाहिजेत**

दुकान कामासाठी अनुभवी माणुस पाहिजे. तरुण होतकरु किराणा अनुभव असल्यास प्राधान्य.
- संपर्क -
8888388407

**पाहिजेत**

तंदुर कारागीर- १
वेटर- १
-: संपर्क :-
9764466000

**पाहिजेत**

कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच अँण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०